विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्र.२०-२६१२५६९६ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई-मेल आय.डी.क्र. Dydpune@gmail.com वेब साईट-www.dydepune.com

जा.क्र./प्रशि-५/व्यकोप्रमा/२०१५-१६/ ९६९६०/६२ दिनांक : 19 AUG 2015

प्रति,

प्राचार्य,
अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
अध्यापक विद्यालय, पुणे विभाग.

विषय:डी.टी.एड प्रथम वर्ष २०१५-१६ बिगर अल्पसंख्यांक/अल्पसंख्यांक व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यतेबाबत.

संदर्भ:१.शासन निर्णय क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का-१, दि ०४/०७/२००८
२.मा.संचालक, म.रा.शै.सं.प्र.प.पुणे-३० यांचेकडील पत्र क्र.मराशैसंप्रप/शिशिप्रकक्ष-४(प्रवेश कक्ष)/१३३५/२०१५-१६, दिनांक २७.४.२०१५
३.या कार्यालयाचे पत्र क्र.१४४३४/३५, दिनांक २९.७.२०१५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय कळविण्यांत येते की, विभागातील अध्यापक विद्यालयातील डी.एल.एड प्रथम वर्षातील व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यतेबाबत 'कोणत्याही परिस्थितीत व्यवस्थापन कोटयाची प्रवेश प्रक्रिया दि १४ जुलै २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावी. दि १५ जुलै २०१५ पासून डी.एल.एड प्रथम वर्षाचे कामकाज सुरु होईल. प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांकडून मान्य करुन घेण्यात यावे.' तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थापन कोटयातून झालेल्या प्रवेशास मान्यता घेण्यासाठी विहत नमुन्यात दि ३० जुलै २०१५ अखेर प्रस्ताव सादर करणेविषयी स्पष्ट आदेशीत केले आहे.

परिषदेकडील संदर्भिय पत्रानुसार आपल्या अध्यापक विद्यालयात व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यता प्रस्तावासोबत खालील प्रमाणे सर्व आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह दिनांक ३० जुलै २०१५ पर्यंत सादर करण्यात यावा. दिनांक ३० जुलै २०१५ नंतर कोणत्याही परिस्थितीत प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.असे स्पष्ट सूचित करण्यात आले होते. सदर सूचनेप्रमाणे दि ३० जुलै २०१५ पर्यंत ज्या अध्यापक विद्यालयांनी खालील नमूद केलेल्या बाबीनुसार व्यवस्थापन कोटा प्रवेश मान्यतेचे परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्या अध्यापक विद्यालयांनी पुढीलप्रमाणे प्रवेशीत विद्यार्थ्यांचे सर्व मूळ कागदपत्रासह माहितीगार व्यक्तीसह उपस्थित राहावे.

१.विद्यार्थ्यांचा अर्ज व त्यावर प्रवेशाबाबतची स्पष्ट शिफारस.२.शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र.३.इ.१० वी गुणपत्रक व प्रमाणपत्र.४.इ १२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र.५.जात प्रमाणपत्र (वैधानिक आरक्षणासाठी)६.जात पडताळणी प्रमाणपत्र(वैधानिक आरक्षणासाठी)७.नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सन २०१५(वैधानिक आरक्षणासाठी)८.डोंगरी क्षेत्राचे प्रमाणपत्र.९.सामाजिक आरक्षणासाठी प्रमाणपत्र.१०.खेळ/चित्रकला/संगीत इ.प्रमाणपत्र.११.शिक्षणात खंड पडला असल्यास तालुका दंडाधिकारी यांचे समोरील बंधपत्र (प्रतिज्ञापत्र) (नोटरी नको)

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर व सोलापूर | २७ ऑगस्ट २०१५ | सकाळी-१०.०० ते सायं.५.००<br>एथेल गॉर्डन अध्यापिका विद्यालय, रास्ता पेठ, पुणे |
| २ | पुणे | २८ ऑगस्ट २०१५ | |

**शिबीरामध्ये प्राचार्य किंवा प्रतिनिधी अनुपस्थित/गैरहजर राहिल्यास तसेच वरील प्रमाणे विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्र सादर न केल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश अमान्य करण्यात येतील. शिबीरानंतर कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांची अपूर्ण असलेली कागदपत्र स्विकारली जाणार नाहीत किंवा प्रवेश मान्य केला जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीस्तव-
प्राचार्य, एथेल गॉर्डन अध्यापिका विद्यालय, रास्ता पेठ, पुणे
प्रत : माहितीस्तव सविनय सादर-
मा.संचालक, म.रा.शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे-३०